दिनांक 01/01/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 213

विषय – केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 / महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत विटा नगरपरिषदेचे सुधारीत पाणी पुरवठा योजना मंजूरीसाठी सादर करणेबाबत विचार करून निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी पा.पु.ज.नि.व. स्वच्छता अभियंता यांची दिनांक 01/01/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. अमृत-2022/प्र.क्र.141/नवि-33 दि.14/07/2022

3) महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. नगरो-2014/प्र.क्र.119/नवि-33 दि.21/08/2014

4) जियो स्पेशियल स्टुडिओ, एल.एल.पी. पुणे यांचेकडून आवक क्र.5760 दि.29/12/2023 ने प्राप्त D.P.R.

विटा शहरामध्ये मुलभूत शैक्षणिक, वैद्यकिय / आरोग्य, वाहतूक व तसेच इतर सोयीसुविधा उपलब्ध होत असलेने तसेच शहराचे असणारे व्यापारी महत्व यामुळे शहराचे चोहो बाजूने झपाट्याने वाढ होत असून मोठ्या प्रमाणात नागरिकीकरण होत आहे. सबब मोठ्या प्रमाणात नागरी वसाहती निर्माण होत असलेने विटा शहराची जुनी पाणी पुरवठा योजना सुधारीत करणे आवश्यक आहे.

पाणी पुरवठा योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी मा.नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.अमृत-2022/प्र.क्र.203/नवि-33, दि.16 सप्टेंबर 2022 मधील केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियानांअंतर्गत प्रकल्पांच्या अंमलबजावणी बाबतच्या सुचनानुसार प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार नेमणेकामी दिलेल्या पर्यायापैकी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी दि.08/04/2021 रोजीचे आदेशाने Empanelment केलेल्या जियो स्पेशियल स्टूडीओ LLP, पुणे यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून जा.क्र.1829 / 2022-2023 दि.27/09/2023 रोजी कार्यादेश देणेत आलेला आहे.

त्यानुसार प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांनी र.रू.87,18,36,500/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव संदर्भ क्र.4 नुसार नगपरिषदेकडे सादर केलेला असून सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीनव प्राधिकरण यांचेकडे सादर करणेत यावा.त्यासाठी आवश्यक तांत्रिक शुल्क भरणेत यावे व संदर्भ क्रं 2 व 3 चे शासन निर्णयानुसार सर्व अटी व शर्तीचे पालन करणेत यावे.

पान नं 2 वर

विटा शहर सुधारित पाणी पुरवठा योजनेस तांत्रिक मान्यता मिळालेनंतर सदरचा प्रस्ताव केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0/ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाकडे सादर करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 01/01/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 214

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील पंचशीलनगर येथील पंप हाउस येथे 22 KW क्षमतेचा पारेषन संलग्न सौरऊर्जा प्रकल्प आस्थापित करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी विदयुत अभियंता यांची दिनांक 01/01/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.
2) विषयांकीत कामी दि. 27/12/2022 रोजी विटा नगरपरिषद व CRDF या संस्थेसोबत झालेला सामंजस्य करार.
3) CRDF,CWAS, CEPT University संस्थेने दि. 29/12/2023 रोजी मेलद्वारे सादर केलेला प्रस्ताव.

संदर्भीय दिनांक 27/12/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव CWAS, CRDF- CEPT विद्यापीठ अहमदाबाद व विटा नगपरिषद विटा यांच्यामध्ये "WASH- Climate Change Project" साठी सामंजस्य करार नुसार CWAS, CRDF- CEPT यांनी विषयांकीत कामी विटा नगरपरिषद मालकीच्या विविध आस्थापनांचा अभ्यास करून सदर ठिकाणी सौरऊर्जा प्रकल्प उभारणेसाठी आवश्यक असणाऱ्या भाराचे प्रमाण संदर्भ क्र. 03 नुसार इकडे सादर केले आहे.

सदर संदर्भ क्र. 03 चे अहवालामध्ये CEPT मार्फत राबविणेत येणाऱ्या पथदर्शी / प्रायोगिक 22 KW क्षमतेच्या पारेषन संलग्न सौरऊर्जा प्रकल्पासाठी पंचशीलनगर येथील पंप हाउसची जागा आपण निश्चित केली असल्याचे: तसेच, 22Kw सौर ऊर्जा प्रकल्पाच्या विकासाचा खर्च CWAS-CRDF CEPT द्वारे करण्यात येणार असलेचे कळविले आहे. सदरील प्रकल्प उभारणेकामी CWAS-CRDF – CEPT यांनी नगरपरिषदेस परवानगी मागितली आहे. सदर अहवालानुसार प्रस्तुत ठिकाणी हा प्रायोगिक प्रकल्प उभारणेकामी खालील अटी व शर्ती

1. दि.27/12/2022 रोजी झालेल्या सामंजस्य करारामधील अटी शर्तींचे काटेकोरपणे पालन करणे.
2. प्रायोगिक प्रकल्प उभारणेसाठी या मान्यतेनंतर एकूण 03 महिन्यांचा कालावधी अनुज्ञेय राहील.
3. प्रकल्प उभारलेनंतर सामंजस्य करारामधील अटीनुसार या प्रकल्पांचे देखभाल दुरूस्ती, प्रचालन करणेची जबाबदारी आपली राहील.

पान नं.2 वर

4. प्रायोगिक प्रकल्प उभारलेनंतर या प्रकल्पाची तांत्रिक क्षमता चाचणी, तांत्रिक लेखा परिक्षण शासनमान्य त्रयस्थ संस्थेकडून करून घेणेची आहे. प्रकल्प उभारलेनंतर या प्रकल्पाची महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.विटा यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.
5. सदरचा प्रायोगिक प्रकल्पाचा काम पुर्णत्वाचा दाखला विटा नगरपरिषदे मार्फत देणेत येईल. सदरील प्रकल्प उभारणीसाठीचा खर्च व इतर तांत्रिक शुल्क अथवा परवनगी शुल्क इत्यादी सर्व प्रकारचा खर्च आपणास अदा करावयाचा आहे.
6. सदरील प्रकल्प उभारणी करत असताना काही अपघात किंवा इतर कोणतीही हाणी झालेस त्याची भरपाई करणे आपणावर बंधनकारक राहील.

तरी सदर प्रकल्प उभारणेस वरील अटी व शर्तीस अधिन राहून CWAS-CRDF – CEPT यांना मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 01/01/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 215

विषय – विटा नगपरिषद हद्दीतील विशेष रस्ता अनुदान योजने अंतर्गत प्रमाणपत्र देणेबाबत

मा.सहाय्यक अभियंता, श्रेणी – 1, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,विटा जि.सांगली यांचेकडील पत्र जा.क्र.1659/2023 दि.20/12/2023 यांचे दाखल पत्रावर निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 01/01/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) शा. नि. रस्तांअ-2023/प्र.क्र.87-ब-12(1)/नवि-16 मुंबई 32 दि.31/03/2023.

3) मा.सहाय्यक अभियंता, श्रेणी – 1, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,विटा जि.सांगली यांचेकडील पत्र जा.क्र.1659/2023 दि.20/12/2023

संदर्भ क्र.2 नुसार विटा नगरपरिषद हद्दीतील विशेष रस्ता अनुदान योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून 04 कामांसाठी 3.90 कोटी अनुदान मंजूर करणेत आलेले आहे. सदरहू कामे करणेसाठी ही शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग ही कार्यान्वयीन यंत्रणा आहे. संदर्भ क्र. 3 नुसार मा.उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,विटा जि.सांगली यांनी प्रमाणपत्र मागणी करणेत आलेली आहे.शासन निर्णया मध्ये नमुद केलेली 04 कामांपैकी 03 कामे खालीलप्रमाणे.

| अ.नं | प्रस्तावित कामांची नावे |
|---|---|
| 1. | विटा नगरपरिषद प्रभाग क्र. 1 मधील पवई टेक ते साळशिंगे रोडला जाणारा रस्ता खडीकरण, डांबरीकरण व गटर करणे. |
| 2. | विटा नगरपरिषद प्रभाग क्र. 8 मधील नारायण शितोळे घर गार्डी हद्दीपर्यंत रस्ता खडीकरण, मुरमीकरण व ओढयावरील साकव बांधणे. |
| 3. | विटा नगरपरिषद प्रभाग क्र.7 मधील मॉडर्न इंग्लिश मिडियम स्कुल ते भावसार घर ते भाजी मंडई गटर करणे. |

वरील कामांचा दोषदायित्व कालावधी पुर्ण झाले नंतर देखभाल व दुरूस्ती करणेची जबाबदारी नगरपरिषदेची राहील. सदर कामांसाठी लागणा-या आवश्यक त्या शासकीय विभागांच्या परवानग्या सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम) सांगली यांनी घेणेच्या आहेत. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, क्र.नपावै-023/प्र.क्र.327(31)/नवि-16 मंत्रालय,मुंबई दिनांक 29 ऑगस्ट 2023 मधील मुद्द क्रं.8 अ नुसार सदर प्रकल्पा अंतर्गत कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणी करावीत.

पान नं.2 वर

तरी वरील कामांना मा.उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,विटा जि.सांगली यांचेकडून मागणी करणेत आलेले प्रमाणपत्र नगरपरिषद अटी व शर्तीस अधिन राहून देणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 01/01/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 216

विषय – विटा नगरपरिषदेच्या शाळांना बेंचेस उपलब्ध करून देणेकामी GeM Portal वरून खरेदी करणेबाबत दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 01/01/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेच्या शाळांना बेंचेस उपलब्ध करून देणेकामी GeM Portal वरून खरेदी करणेबाबत खालील निविदा दाखल आहेत.

1) Dynamic Solutions र.रू.8,00,000/-

2) I-SMART TECHNO SOLUTIONS र.रू.6,85,000/-

3) Shree Agro &Engg.Solutions र.रू.7,80,000/-

उपरोक्त निविदापैकी I-SMART TECHNO SOLUTIONS यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 01/01/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 217

विषय – नगपरिषद हद्दीतील विविध ठिकाणी सिमेंट बेंचेस खरेदी करणे व जागेवर कॉंक्रीटमध्ये बसवून देणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 01/01/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

नगपरिषद हद्दीतील विविध ठिकाणी सिमेंट बेंचेस खरेदी करणे व जागेवर कॉंक्रीटमध्ये बसवून देणेकामी खालील निविदा दाखल आहेत.

| | |
|---|---|
| 1) ईको ग्रीन सेल्स ॲण्ड सर्विसेस | प्रति नग र.रू.4,000 /- |
| 2) राजमुद्रा फाऊन्डेशन विटा | प्रति नग र.रू.3,800 /- |
| 3) अनंत इंटरप्रायजेस | प्रति नग र.रू.4,200 /- |

उपरोक्त निविदापैकी राजमुद्रा फाऊन्डेशन विटा यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 01/01/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 218

विषय – नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत भवानीमाळ येथील पडकी विहीर ते तेजस पाटील घर ते ओढापर्यंत आर.सी.सी. गटर करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी इंजिनियर यांची दिनांक 22/12/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

मा. जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचे दि.03/07/2023 चे पत्राने नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजनाअंतर्गत सन 2023-2024 करिता र.रू. 12,55,561/- इतकी रक्कम शिल्लक असून नवीन प्रस्ताव जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत पाठविणे बाबत पत्र दिलेले आहे. नगपरिषद वार्ड क्र. 7 मधील भवानीमाळ येथील पडकी विहीर ते तेजस पाटील घर ते ओढ्यापर्यंत आर.सी.सी. गटर करणे हे काम आवश्यक आहे. तेथे सध्या सांडपाण्याचा निचरा होत नाही. खुल्या प्लॉटमध्ये सांडपाणी साठत असलेने डासांचा प्रार्दुभाव फार वाढत आहे. तसेच दुर्गंधीमुळे नागरीकांचे आरोग्यास धोका निर्माण होत आहे.तरी सदरचे काम नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत घेणेत यावे. या कामाचे अंदाजपत्रक र.रू. 19,52,638/- चे झाले आहे.

तरी नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत भवानीमाळ येथील पडकी विहीर ते तेजस पाटील घर ते ओढापर्यंत आर.सी.सी. गटर करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा